मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दिनांक ७ सप्टेंबर २०२५ । पान १

# पारंपरिक वाद्य अन आकर्षक रोषणाईसह सजवलेल्या रथांनी बाप्पांची भव्य मिरवणूक

## भोसरीकरांचा गणरायाला भावपूर्ण निरोप

**भोसरी**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पारंपरिक वाद्यांचा नाद, सजवलेल्या रथांची शोभा आणि गणेश मंडळांच्या विविध उपक्रमांना नागरिकांचा मिळणारा प्रतिसादः अशा उत्साहमय वातावरणात भोसरी परिसरात शुक्रवारी (५ सप्टेंबर) गणेश विसर्जन मिरवणूक पार पडली. या विसर्जन मिरवणुकीत सहभागी झालेल्या मंडळांचे भोसरी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली भोसरी येथील गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांचे स्वागत करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे स्वागत कक्ष उभारण्यात आला होता. या ठिकाणी गणेश मंडळांची मिरवणूक आल्यानंतर मंडळांच्या प्रतिनिधींचा सन्मान करून त्यांचा गौरव करण्यात आला.

महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता शिवराज वाडकर, संतोष दुर्गे, क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल



पुराणिक,सहाय्यक आरोग्याधिकारी राजेश भाट यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**या मंडळांचा करण्यात आला सन्मान..**

कानिफनाथ मित्र मंडळ भोसरी (गावठाण), छत्रपती मित्र मंडळ भोसरी, लांडगे लिंबाची तालीम भोसरी, कै. दामूशेठ गव्हाणे मित्र मंडळ गव्हाणे वस्ती भोसरी, लांडगे ब्रदर्स अँड फ्रेंड्स सर्कल भोसरी (गावठाण), श्रीराम मित्र मंडळ लांडगे आळी भोसरी, नरवीर तानाजी तरुण मंडळ दिघी रोड, उंबऱ्या गणपती मित्र मंडळ दिघी रोड, अष्टविनायक मित्र मंडळ दिघी रोड, समस्त गव्हाणे तालीम मित्र मंडळ भोसरी, मधले फुगे तालीम भोसरी (गावठाण), श्रीकृष्ण मित्र मंडळ गवळी नगर, नायसाहेब प्रतिष्ठान भोसरी (गावठाण), नवज्योत गणेश मित्र मंडळ, पठारे लांडगे तालीम भोसरी गाव, खंडोबा मित्र मंडळ खंडोबा माळ, फुगे-माणे तालीम मित्र मंडळ.

**विसर्जन घाटांवरील व्यवस्था..**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने गणेश विसर्जन घाटांवर कृत्रिम विसर्जन हौद, निर्माल्य कुंड, मूर्ती संकलन केंद्र अशा विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भोसरी येथे अनेक मंडळांनी कृत्रिम हौदांचा वापर करून मूर्ती विसर्जित केल्या, तर काहींनी महापालिकेच्या संकलन केंद्रांना मूर्तीदान करण्याचा उपक्रम राबवला. विसर्जन घाटांवर होणारी गर्दी लक्षात घेऊन महापालिकेच्या वतीने विसर्जन घाटांवर जीवरक्षक, सुरक्षा पथक, आपत्ती व्यवस्थापन पथक, रुग्णवाहिका, वैद्यकीय व आरोग्य पथक अशा सर्व यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आल्या आहेत.



# पिंपरीत भव्य हनुमान रथात विराजमान होऊन मित्र सहकार्य तरुण मंडळाच्या 'नवसाच्या महागणपती'चे मोठ्या उत्साहात विसर्जन!

**पिंपरी**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरीगाव येथील मित्र सहकार्य तरूण मंडळाचा बाप्पा नवसाचा महागणपती म्हणून ओळखला जातो. मंडळाचे यंदाचे हे ६१ वे वर्ष असून प्रथेनुसार या मंडळाची मिरवणूक पारंपारिक वाद्य ढोल ताशांच्या गजरात दुपारी सुरू झाली. भव्य दिव्य हनुमान रथ हा यंदाच्या मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण होतं.

पिंपरीगाव येथील तपोवन रस्त्यावर या मंडळाचे गणेश मंदीर आहे. या मंडळाच्यावतीने वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात.





मित्र सहकार्य तरूण मंडळाच्या नवसाच्या महागणपतीची मिरवणूक ही मानाची मानली जाते. पिंपरीत या मंडळाच्या मिरवणूकीने विसर्जनला सुरूवात होते. मंडळाने प्रथेनुसार यंदाच्या वर्षी देखील मिरवणूकीत डॉल्बी, डिजेला फाटा देत पारंपारिक पध्दतीच्या ढोल ताशांचा वापर केला आहे. ही मिरवणूक पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

# गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच ध्येय असावे - डॉ दीपक शहा

## शिक्षण विश्व:आर्टिफिशियल इंटेलिजन्सबाबत शिक्षकांना डॉ. शैलेश गुजर यांच्याकडून मार्गदर्शन

**चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शिक्षक दिन केवळ एक दिवस नव्हे, तर वर्षातील सर्व ३६५ दिवस साजरा व्हावा, असे मत कमला एज्युकेशन सोसायटीच्या प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक सचिव डॉ दीपक शहा यांनी व्यक्त केले.

चिंचवड येथील संस्थेच्या प्रांगणात शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन, गुणवंत प्राध्यापकांचा सत्कार तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका साकारून कार्यक्रमात रंग भरले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ शहा होते. प्रमुख वक्ते म्हणून आयुर्वेदाचार्य डॉ शैलेश गुजर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी व्यासपीठावर शिक्षणतज्ञ धनंजय कदम, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ राजेंद्र कांकरिया, संस्थेच्या खजिनदार डॉ भूपाली शहा, संचालिका डॉ तेजल शहा, प्राचार्या डॉ क्षितिजा गांधी, डॉ पौर्णिमा कदम, डॉ वनिता कुऱ्हाडे, वृंदा जोशी, एमबीए विभागाचे संचालक डॉ सचिन बोरगावे आदी उपस्थित होते.

डॉ शहा पुढे म्हणाले की, प्रतिभा महाविद्यालयाने अल्पावधीतच शहरात स्वतःचा ठसा उमटवला आहे. हे यश येथील प्राध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत बाह्यजगाची अद्ययावत माहिती मिळावी व त्यांचे सर्वांगीण विकास साधण्यासाठी संस्थेने नेहमीच प्रयत्न केले आहेत. शिक्षणतज्ञ धनंजय कदम यांनी केंब्रिज कोर्सेस, इंग्रजी भाषेचे महत्त्व आणि त्यावरील प्रभुत्व या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी जागतिक पातळीवर संवाद साधण्यासाठी इंग्रजीवर प्रभुत्व मिळिवण्याचे आवाहन त्यांनी केले.



यावेळी डॉ शैलेश गुजर, डॉ दीपक शहा आणि डॉ भूपाली शहा यांच्या हस्ते पीएचडी प्राप्त केलेले डॉ रोहित आकोलकर, डॉ शबाना शेख यांचा तसेच सेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या प्रा. प्रीती जगताप आणि प्रा. रूपाली नानकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावून एक वेगळी शिकवण दिली. तबस्सूम शेख हिने प्राचार्याची भूमिका यशस्वीरित्या पार पाडली. तिचा सत्कार डॉ राजेंद्र कांकरिया, डॉ क्षितिजा गांधी व डॉ जयश्री मुळे यांनी केला.

प्रसंगी प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलमध्ये विविध गुणदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. याचे आयोजन प्राचार्या वृंदा जोशी, उपमुख्याध्यापिका लीजा सोजू व शिक्षिका गुलनाज खान यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुवर्णा गोगटे यांनी, प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. सुप्रिया गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अमोल शिंदे यांनी केले.

### शिक्षकांनो, स्वतःला सिद्ध करा - डॉ शैलेश गुजर

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना डॉ शैलेश गुजर यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) हे भविष्याचे तंत्रज्ञान असून, शिक्षण क्षेत्रात त्याचा प्रभाव लवकरच दिसू लागेल. शाळा-महाविद्यालयांमध्ये रोबोट्स शिक्षण देऊ लागतील का, हा प्रश्न उभा राहतो. अशा वेळी जो शिक्षक सतत ज्ञानार्जन करेल, संशोधन करेल व स्वतःला सिद्ध करेल, तोच भविष्यात टिकेल.